जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर.

ईमेल :- cp.thane.pro@mahapolice.gov.in

मो.क्र. ९८१९२०८२७९

'' प्रेस नोट '' **दि. १८/०९/२०२५**

'' वाहनचोरी करणा-या सराईत आरोपीस अटक करून एकुन ०७ वाहनचोरी चे गुन्हे उघडकिस आणुन ०२,८५,००० /-रुपये किमंतीचा मुददेमाल हस्तगत,''

गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे ची कामगिरी

----------ooooo----------

दिनांक १२/०९/२०२५ रोजी कळवा पोलीस ठाण्याचे हददीतुन खारेगाव परिसरातुन रोडचे कडेला पार्क केलेली ऑटो रिक्षा चोरी झाल्याबाबत कळवा पोलीस स्टेशन, गुन्हा रजि.नं. ७४८/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. घडलेल्या गुन्हयासंदर्भात मा. वरिष्ठांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत गुन्हे शाखेस सुचना दिल्या होत्या.

नमुद दाखल गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे कडून करण्यात येत असताना तपासामध्ये घटनास्थळावर प्राप्त CCTV फुटेज तपासले असता एक संशयीत आरोपीत हा दिनांक ११/०९/२०२५ रोजी रात्री घटनास्थळावर येवुन रिक्षा चोरी करून घेवनु गेल्याचे **गुन्हे शाखा घटक ०१ चे नेमणुकीतील सपोउपनिरी/दयांनद नाईक व पोहवा/४१७४ संदिप महाडीक यांनी निष्पन्न केले.**

आरोपीत हा ज्या दिशेने रिक्षा घेवुन गेला त्या ठाणे माजीवाडा,घोडबंदर रोड वरील सीसीटीव्ही पडताळुन आरोपीत याचा ठावठिकाणा निष्पन्न करून आरोपीत नामे करण बाळु आढाव याला प्रस्तुत गुन्हयामध्ये दिनांक-१५/०९/२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे.अटक आरोपीत यांचे कडे सपोनि/विजय मोरे , पोउपनिरी/दिपक घुगे, सपोउपनिरी/दिपक जाधव यांनी केलेल्या कौशल्यपुर्वक तपासामध्ये अटक आरोपीत याने दाखल गुन्हयाचे व्यतिरिक्त ठाणे पोलीस आयुक्तालयात आणखी ०६ वाहन चोरीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न केले.

अटक आरोपींची नांवे :-

०१) करण बाळु आढाव वय-२४ वर्षे राह-जय भिम नगर,झोपडपटटी, कळवा पश्चिम ठाणे

अटक आरोपी यांची गुन्हे करण्याची पध्दत:-

अटक आरोपीत हा त्याचे कडे असलेल्या '' मास्टर की '' ने रोडचे कडेला पार्क केलेल्या ऑटो रिक्षा तसेच मोटारसायकल चालु करून त्या चोरी करतो. अटक आरोपीत यांने ठाणे पोलीस आयुक्तालयातील कळवा ,नौपाडा,कापुरबावडी ,खडकपाडा व गणेशपुरी पोलीस स्टेशन (ठाणे ग्रामिण) अशा विविध ठिकाणाहुन मागील ०१ महीन्याच्या कालावधी मध्ये ०२ ऑटो रिक्षा व ०५ मोटारसायकल अशी एकुन ०७ वाहने चोरी केलेली आहे.

आज रोजी पर्यत हस्तगत मालमत्ता :

अ. नु	पोलीस स्टेशन	गुन्हा रजि क्र व कलम
०१	कळवा पोलीस स्टेशन	गुरंन ७४८/२०२५ बीएनएस क ३०३(२) प्रमाणे दाखल गुन्हयातील ३०,०००/-रू किं ची ऑटो रिक्षा क्र MH 04 HZ 2859 ही जु वा किं.सु.

०२	कळवा पोलीस स्टेशन	गुरंन ७२९/२०२५ बीएनएस क ३०३(२) प्रमाणे दाखल गुन्हयातील ४०,०००/-रू किं स्प्लेन्डर मोटारसायकल क्र MH 04 JP 7227 ही जु वा किं.सु.
०३	नौपाडा पोलीस स्टेशन	गुरंन ६५३/२०२५ बीएनएस क ३०३(२) प्रमाणे दाखल गुन्हयातील ७०,०००/-रू कि ची ॲक्टीवा मोटारसायकल क्र MH 04 DF 2752 ही जु किं. सु.
०४	कापुरबावडी पोलीस स्टेशन	गुरंन ७४८/२०२५ बीएनएस क ३०३(२) प्रमाणे दाखल गुन्हयातील २०,०००/-रू किची ॲक्टीवा आय मोटरसायकल क्र MH 05 CN 5236 ही जु वा किं.सु.
०५	खडकपाडा पोलीस स्टेशन	गुरंन ७४८/२०२५ बीएनएस क ३०३(२) प्रमाणे दाखल गुन्हयातील ६०,०००/-रू किची हॉनेट मोटारसायकल क्र MH 05 DY 9760 ही जु वा किं. सु.
०६	नारपोली पोलीस स्टेशन	गुरंन ७४८/२०२५ बीएनएस क ३०३(२) प्रमाणे दाखल गुन्हयातील ५५,०००/-रू किची ऑटो रिक्षा क्र MH 05 GN 1521 ही जु वा किं.सु.
०७	गणेशपुरी पोलीस स्टेशन ठाणे ग्रामिण	गुरंन ७४८/२०२५ बीएनएस क ३०३(२) प्रमाणे दाखल गुन्हयातील १०,०००/-रू किची स्प्लेन्डंर मोटारसायकल क्र MH 04 HL 55478 ही जु वा किं.सु.

असे वरील प्रमाणे वाहन चोरीचे एकुण ०७ गुन्हे उघडकिस आणुन ०२,८५,०००/-रूपये किमतीची ०७ वाहने हस्तगत केली आहेत .

<u>आरोपीत करण बाळु आढाव याचा गुन्हे अभिलेख</u>

अ.नु	गुन्हा रजि क्र व कलम	पोलीस ठाणे
०१	गुरंन २२७/२०२४ भादवि क ३७९	कापुरबावडी पोलीस स्टेशन
०२	गुरंन ४१५/२०२४ भादवि क ३९२	कापुरबावडी पोलीस स्टेशन
०३	गुरंन २३६/२०२४ भादवि क ४५४,४५७,३८०	कापुरबावडी पोलीस स्टेशन
०४	गुरंन २३५/२०२४ भादवि क ३७९,३४	कापुरबावडी पोलीस स्टेशन
०५	गुरंन २३७/२०२४ भादवि क ३७९,३४	कापुरबावडी पोलीस स्टेशन
०६	गुरंन ३८२/२०२४ भादवि क ३७९	कळवा पोलीस स्टेशन

सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री. अमरसिंह जाधव, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध १, गुन्हे शाखा, ठाणे श्री. शेखर बागडे, यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सचिन गायकवाड, सहा.पोलीस निरीक्षक विजय मोरे, पोलीस उप निरीक्षक दिपक घुगे, सहा.पो.उप निरी. दयांनद नाईक, दिपक जाधव, सुनिल माने, पोहवा/संदीप महाडीक,प्रशांत निकुंभ, दिपक जाधव, नंदकुमार पाटील ,शशिकांत सावंत, पोशि/सागर सुरळकर यांनी केली आहे.